सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

☏- 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

नियंत्रण कक्ष ☏ - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

जा.क्रं./ प्रेस नोट / 13 पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2026 / दिनांक : 11 / 01 / 2026

# 1)आत्महत्येस प्रवृत्त केले :

**1)नांदेड ग्रामीण :–** दिनांक 09.01.2026 रोजी 13.00 वा. चे सुमारास, **न्यायनगर कौठा नांदेड येथे,** यातील मयत नामे तृप्ती हेमंत चेरलेवार, वय 24 वर्षे, रा. न्यायनगर कौठा नांदेड हिस यातील आरोपी नामे 1.कुसुमताई दादाराव चेरलेवार, 2.रोहित दादाराव चेरलेवार, 3.हेमंत दादाराव चेरलेवार, तिघे रा.न्यायनगर कौठा नांदेड 4.श्रावण वासमवार, रा. नांदेड 5.उमाकांत वासमवार, रा.नांदेड 6.कांचन, 7.रेणुका यांनी संगनमत करून यातील मयतास हुंडयासाठी वारंवार शारीरीक व मानसीक त्रास दिल्याने त्रासाला कंटाळून तणावात येवून तिने गळफास घेवून आत्महत्या केली तिला यातील नमुद आरोपीने आत्महत्येस प्रवृत्त केले. वगैरे **फिर्यादी राम कोंडीबा देवके, वय 45 वर्षे, व्यवसाय शेती रा. हिमतपूर बळीरामपूर ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 26 / 2026 कलम 108,3(5),80,85, 351(3)भारतीय न्याय संहिता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि / श्री गायकवाड, मो. नं. 9067510100** हे करीत आहेत.

**2)लोहा :–** दिनांक 29.12.2025 रोजी 06.00 वा. चे सुमारास, **मौ किरोडा शेत शिवार ता.लोहा जि. नांदेड येथे,** यातील मयत नामे वैभव पदमाकर किडे, वय 29 वर्षे, रा. चिखलभोसी ता.कंधार यास आरोपी नामे प्रदुम्न प्रदिप चव्हाण रा.हिराबोरी तांडा ता.लोहा यांने मयतास फायनान्सचे पैसे देण्याचे कारणावरून तगादा लावून मानसीक त्रास दिल्याने त्रासाला कंटाळून तणावात येवून गळफास घेवून आत्महत्या केली नमुद मयताचे खिशामध्ये सोसाईड नोट मिळून आल्याने त्यास नमुद आरोपीने आत्महत्येस प्रवृत्त केले. वगैरे **फिर्यादी पदमाकर शिवाजी किडे, वय 50 वर्षे, व्यवसाय शेती रा. चिखलभोसी ता.कंधार** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरनं 13 / 2026 कलम 108 भारतीय न्याय संहिता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि / श्री पठाण, मो. नं. 9970776219** हे करीत आहेत.

# 2)गंभीर दुखापत :–

**नांदेड ग्रामीण :–** दिनांक 10.01.2026 रोजी 14.00 वा. चे सुमारास **कौठा नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1. राजकुमार राधेश्याम राठोड, रा. हरियाणा 2.राहुलसिंग ओमसिंग पुजारी, रा.गुरूव्दारा नांदेड यांनी संगनमत करून फिर्यादीचे मुलास जुन्या भांडणाचे कारणावरून पोटावर,छातीवर चाकुने मारहाण करून गंभीर दुखापत केली.तसेच यातील साक्षीदार नामे हिरा हा भांडण सोडविण्यासाठी गेला असता त्यास मारहाण केले. वगैरे **फिर्यादी गुरूमितकौर लखनसिंग राठोड, वय 37 वर्षे, रा. बाबादिपसिंग नगर बाफना नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 31 / 2026 कलम 118(2),118(1),351(2),(3),3(5) बीएनएस–2023 कायदा सह कलम 4 / 25 भाहका प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ / 1336 वाघमारे मो.नं. 9730626514** हे करीत आहेत.

# 3)भारतीय हत्यार कायदा :–

**शिवाजीनगर :– मा.श्री अबिनाश कुमार,** पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी स्ट्रिट सेफ्टी ड्राईव्ह अंतर्गत स्ट्रिट सेफ्टी पथक आणी शहरातील सर्व पोलीस स्टेशन यांना भारतीय हत्यार कायदा अन्वये कार्यवाही करण्याचे आदेशीत केले होते त्या अंतर्गत दिनांक 10.01.2026 रोजी 21.00 वा. चे सुमारास, **राज कार्नर सार्वजनिक रोडवर नांदेड येथे,** यातील एक विधीसंघर्षीत बालक रा.सिडको नांदेड हा विना परवाना बेकादेशीररीत्या आपले ताब्यात एक लोखंडी खंजर बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि / नरेश केशव वाडेवाले, ने. पोस्टे भाग्यनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 25 / 2026 कलम 4 / 25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ / 51 जाधव, मो.क्रं. 9067952076** हे करीत आहेत.

## 4)प्रोव्हिबिशन :–

**नांदेड ग्रामीण :–** दिनांक 10.01.2026 रोजी 12.15 वा. चे सुमारास, **वाजेगाव बायपास ब्रिजजवळ नांदेड येथे,** आरोपी नामे देवानंद शिवाजी मोळके, वय 40 वर्षे, रा. वसरणी नांदेड हा स्वताचे फायदया करीता विना परवाना बेकायदेशिररीत्या देशी दारु भिंगरी संत्रा किंमती 2000/–रू. चा मुद्देमाल चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने आपले ताब्यात बाळगलेला मिळून आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/1812 सत्तार मगदुम शेख, नेम पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 28/2026 कलम 65(ई)म.प्रो.का प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/486 तेलंग, मो.नं. 9923588112** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी,**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड